**महाराष्ट्र सत्यमेव जयते शासन**
**शालेय शिक्षण विभाग**
विभागीय शिक्षण उपसंचालक, नाशिक कार्यालय नाशिक, महसुल आयुक्त आवार, नाशिकरोड, नाशिक
दुरध्वनी 0253-2454910 Fax No. 0253 2454815 e-mail. dydenskest@yahoo.com

---

जा.क्र.शिउसं/नावि/मित्र उपक्रम/२०१५/ 12604/12
दि.२०/८/२०१७

प्रति,

शिक्षणाधिकारी (माध्यमिक / प्राथमिक)
जिल्हा परिषद (नाशिक, धुळे, नंदुरबार, जळगांव)

विषय : तालुका मित्र समन्वयक म्हणून एका अधिकाऱ्याकडे मित्र उपक्रमाची जबाबदारी सोपविणे व सर्व तालुक्यांच्या मुख्यध्यापकांचे ३ तासांचे प्रशिक्षण आयोजीत करणे बाबत

संदर्भ : १. शासन परिपत्रक संकीर्ण-२०११/२९६/११/माशि-३, मंत्रालय, मुंबई दि.२७ जानेवारी २०१२
२. मा. शिक्षण संचालनालय (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य पुणे यांचे परिपत्रक दि.११ जूलै २०१२

उपरोक्त संदर्भिय पत्रान्वये आनापान साधना बाबत (विपश्यना साधनेची पहिली पायरी) आपल्या जिल्हयातील सर्व व्यवस्थापनाच्या सर्व माध्यमाच्या शाळेतील इयत्ता ५ वी ते १२ वी पर्यंतच्या सर्व विद्यार्थ्यांकरीता "मित्र उपक्रम" प्रभावीपणे राबविण्याकरीता आपल्या सर्व तालुक्यातील गटशिक्षणाधिकारी यांच्या मार्फत एका जबाबदार शिक्षण विस्तार अधिकाऱ्याची नियुक्ती करावी व त्याबाबतचा अहवाल त्वरीत या कार्यालयास परिशिष्ट १ प्रमाणे सादर करावा, तसेच तालुक्यातील सर्व मुख्याध्यापकांचे आनापान प्रशिक्षण कार्यशाळा (३ तास) आयोजीत करून परिशिष्ट २ प्रमाणे माहिती दि.१५/१०/२०१७ पर्यंत सादर करावी.

(रामचंद्र जाधव)
शिक्षण उपसंचालक
नाशिक विभाग, नाशिक

सोबत :
१. मित्र उपक्रम अंतर्गत करावायाची कामे
२. परिशिष्ट १
३. परिशिष्ट २

प्रत: माहितीस्तव सविनय सादर
१. मा. विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, महसुल आयुक्त कार्यालय, नाशिक
२. मा. आयुक्त, शिक्षण, महाराष्ट्र राज्य, बालभारती भवन, सेनापती बापट मार्ग, पुणे -४
३. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक, धुळे, नंदुरबार, जळगांव
४. मा. श्री. व्ही. टी. गोसर, समन्वयक, मित्र उपक्रम, नाशिक विभाग, कॅमल हाऊस, नाशिक पूणे रोड, नाशिक ११
५. मित्र उपक्रम कार्यशाळा संपर्क श्री. उल्हास फुलझेले मो.९५२७३९१७७०, ९४२२७५८९६३ mitra.nasik@gmail.com ; Web- www.mitraupakram.net.

## मित्र उपक्रमाअंतर्गत कामे

1. आपल्या तालुक्यात मित्र उपक्रम कार्यान्वित आणण्यासाठी कमीत कमी एक वेळा 10 दिवसांचा विपश्यना साधना अभ्यासक्रम पुर्ण केलेल्या शिक्षकांची शाळा निहाय यादी तयार करणे.

2. आपल्या तालुक्यातील सर्व मुख्याध्यापकांसाठी 3 तासाचे अनापान प्रशिक्षण कार्यशाळा (सन 2015—2016.) त्वरीत आयोजित करावी .

3. मुख्याध्यापकांनी आनापानाचे प्रशिक्षण पुर्ण केल्यावर त्यांच्या मार्फत अन्य सर्व शिक्षकांना याबाबतचे 3 तासांचे प्रशिक्षण देण्याची व्यवस्था करण्याविषयी कार्यवाही करावी.

4. मुख्याध्यापकांनी 5 वी ते 10 वी तील सर्व विद्यार्थ्यांना 70 मिनीटाचे आनापान तसेच शाळा सुरु होतांना व शाळा सुटण्यापूर्वी दरदिवशी 10 मिनिटे मित्र साधनेचा (आनापान) अभ्यास सुरु होईल यांची खात्री करुन तसा अहवाल शाळेकडुन मागवावा.

5. दरवर्षी मित्र उपक्रम उजळणी वर्ग घेवून योग्य रीतीने संबंधित शाळेत मित्र उपक्रम सुरु असल्याची खात्री करुन अहवाल जिल्हा समितीला पाठवावा.

6. आपल्या तालुक्यात मित्र उपक्रम जलद गतीने कार्यान्वित आणण्यासाठी 10 दिवस विपश्यना साधना करण्यास इच्छूक शिक्षकांची यादी तयार करावी व त्यांचे शिबीर पूर्ण करण्यासंबंधीची कार्यवाही पूर्ण करावी.

7. स्थानिक स्वराज्य संस्था मार्फत दिला जाणारा आर्दश शिक्षक पुरस्काराच्या निकषात शिक्षकांचे मित्र उपक्रमांतील योगदान अंर्तभूत करावे.

8. शिक्षण विस्तार अधिकारी, गट शिक्षणाधिकारी व क्षेत्रिय अधिकाऱ्यांनी त्यांच्या प्रत्येक भेटी अंती शाळेच्या अभिप्राय नोंदवहीत मित्र उपक्रम अमंलबजावणीची नोंद घेतली असल्याची खात्री करून घेणे

परिशिष्ट १

मित्र उपक्रम अंतर्गत जिल्हा नंदुरबार
तालूक्यातील नियुक्त जबाबदार शिक्षण विस्तार अधिकारी

| अ. क्र. | तालूका | नियुक्त केलेल्या शिक्षण विस्तार अधिकाऱ्याचे पूर्ण नाव | मोबाईल क्रमांक | ईमेल पत्ता |
|---|---|---|---|---|
| १ | नंदुरबार | | | |
| २ | नवापूर | | | |
| ३ | शहादा | | | |
| ४ | तळोदा | | | |
| ५ | अक्कलकुवा | | | |
| ६ | धडगाव | | | |

शिक्षणाधिकारी, नंदुरबार

परिशिष्ट २

मित्र उपक्रम अंतर्गत जिल्हा नंदुरबार

| अ. क्र. | तालूका | एकूण शाळा ५ वी ते १० वी व ५ वी ते ७ वी | एकूण विद्यार्थी ५ वी ते १० वी व ५ वी ते ७ वी | तालुक्यातील प्रत्यक्ष १० मिनीटे २ वेळा आनापान साधना करीत असलेल्या एकूण शाळा | तालुक्यातील प्रत्यक्ष १० मिनीटे २ वेळा आनापान साधना करीत असलेले एकूण विद्यार्थी |
|---|---|---|---|---|---|
| १ | नंदुरबार | | | | |
| २ | नवापूर | | | | |
| ३ | शहादा | | | | |
| ४ | तळोदा | | | | |
| ५ | अक्कलकुवा | | | | |
| ६ | धडगाव | | | | |

शिक्षणाधिकारी, नंदुरबार